प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
RBI On Internet: http://www.rbi.org.in
हिन्दी वेबसाइट http://www.rbi.org.in/hindi
Email: helpprd@rbi.org.in

प्रेस सम्पर्क प्रभाग, केंद्रीय कार्यालय, पोस्ट बॉक्स 406, मुंबई 400 001
फोन: 2266 0502 फैक्स: 2266 0358, 2270 3279

PRESS RELATIONS DIVISION, Central Office, Post Box 406, Mumbai 400001
Phone: 2266 0502 Fax: 2266 0358, 2270 3279

दिनांक :३० सप्टेंबर, २००६

**ऑक्टोबर ३, २००६ पासून दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड च्या शाखा, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक लि. च्या शाखा म्हणून कार्यरत राहतील.**

भारत सरकारने आज दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड चे इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक लि.मध्ये एकत्रिकरण/ विलीनीकरण करण्याची योजना मंजूर केली आहे. हे एकत्रीकरण, ऑक्टोबर ३,२००६ पासून अंमलात येईल. या तारखेपासून, दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड च्या सर्व शाखा, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक लि. च्या शाखा म्हणून कार्यरत राहतील.

ऑक्टोबर ३, २००६ पासून दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. चे ग्राहक आणि ठेवीदार हे इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक लि. चे ग्राहक म्हणून आपापली खाती चालू ठेवतील. दि युनायटेड वेस्टर्न बँक लिमिटेड च्या ग्राहकांना नेहमीप्रमाणेच सेवा देता यावी यासाठी इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँक लि. योग्य ती व्यवस्था करीत आहे.

एकत्रीकरणाच्या याजनेनुसार दि युनायटेड वेस्टर्न बँकेच्या सभासदांना, त्यांच्या समभागांच्या अधिकाराच्या अंशतः फेडीसाठी प्रत्येक पूर्णतः पेड-अप (भरणा झालेल्या )समभागासाठी समोरासमोर(अपफ्रंट) रु.२८/- (रुपये अठ्ठावीस फक्त) रोख रक्कम, इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट बँकेकडून त्या नियोजित तारखेस बँकेचे नोंदणीकृत भागधारक असलेल्या सभासदांना दिले जातील. याशिवाय, या योजनेच्या तरतुदीनुसार, दि युनायटेड वेस्टर्न बँकेच्या मालमत्तेमधुन तिच्या दायित्वांची फेड केल्यानंतर काही अतिरिक्त राशी उरल्यास, या नियोजित कालानंतर भागधारकांना त्यांच्या हिश्श्याप्रमाणे (प्रोरेटा) रक्कम मिळू शकेल.

जी रघुराज
दुय्यम महाव्यवस्थापक

प्रेस रिलीज : २००६-२००७/४६२